**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

क्र.संगाबाअवि/१३/विक/ ८२ /२०१५
दिनांक : २८/४/२०१५

प्रति,
**मा. प्राचार्य / विभाग प्रमुख**
सर्व संलग्नित महाविद्यालये व
सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबत...**
**संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक रिट याचिका-०११२/२८७/प्र.क्र.७८/विशा १ अ**
**दि. २२ एप्रिल, २०१५**

**महोदय,**

दरवर्षी २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व क्रिडा सामन्यांच्या वेळी विद्यार्थी व नागरीकांकडून कागदाच्या व प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजांचा वापर करण्यात येतो. सदर कार्यक्रम पार पाडल्यानंतर फाटलेले कागदी राष्ट्रध्वज तसेच प्लास्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात. असे राष्ट्रध्वज पायदळी तुडविले जातात, त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. सबब मा.न्यायालयाने दि. ३०.३.२०१५ रोजी दिलेले निदेश आणि ध्वजसंहिता, २००२ व राष्ट्रीय अवमान कायदा, १९७१ च्या अधीन राहून संदर्भाकित सहपत्रानुसार उपाययोजना करावयाच्या आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५०४२२१५५५४८८८२९ असा आहे.

कृपया उपरोक्त अत्यंत महत्वपुर्ण बाबीची आपण नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

आपला,

**( प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख )**
संचालक,
विद्यार्थी कल्याण,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी : माहितीकरीता
मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई